# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – २८ मार्च २०१६

## विद्यापीठाचा सर्वसमावेशक आणि विद्यार्थीकेंद्रीत ६३९.५४ लाखांचा शिलकीचा अर्थसंकल्प मंजूर

मुंबई – मुंबई विद्यापीठाचा विद्यार्थीकेंद्रीत आणि सर्वसमावेशक असा २०१६ - १७ सालचा ६३९.५४ लाखांचा शिलकीचा अर्थसंकल्प आज पार पडलेल्या अधिसभेत मंजूर करण्यात आला. विद्यापीठाच्या वतीने कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी अधिसभेत अर्थसंकल्प सादर केला.ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या मुंबई विद्यापीठाने समाजाचे बौध्दिक आणि नैतिक शक्तीस्थान म्हणून गेल्या १५८ वर्षांत भरीव कामगिरी करत सामाजिक मुल्य आणि संधींची सतत वाढणारी जबाबदारी उत्साहाने वागवत देशाला विशेषतः महाराष्ट्र आणि मुंबई शहराला उत्तम गुणवत्ता दिली आहे.याच पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाने यावर्षीचा सर्वसमावेश असा अर्थसंकल्प सादर केला.यामध्ये विविध नाविण्यपूर्ण योजनांसह अनेक विकासकामांना प्राधान्य देण्यात आले आहे.यामध्ये कौशल्य विकास केंद्र,मेक इन इंडिया केंद्र ,डिजीटल विद्यापीठ,संरक्षित जागेचा विकास,स्मार्ट गाव योजना,शैक्षणिक विद्वतेची जोपासना,विद्यार्थी व्यवसाय मार्ददर्शन केंद्र,रेल्वे संशोधन केंद्र,विद्यापीठाची सामाजिक जबाबदारी,१६० व्या वर्धापन दिनासाठी करण्यात आलेली विशेष अर्थसंकल्पीय तरतूदींसह विद्यापीठ सुधारणांवर भर देत विद्यार्थीकेंद्रीत अर्थसंकल्प सादर करण्यात आला.

याबरोबरच २०१६- २०१७ या वर्षामध्ये नियोजित बांधकामांमध्ये विद्यानगरी येथील एकेडेमिक स्टाफ कॉलेजच्या वसतिगृहाचे बांधकाम,झाराप येथे सिंधू स्वाध्याय संस्था,ठाणे उपकेंद्रामध्ये मुला-मुलींसाठी वसतिगृहांचे बांधकाम,बाबु जगजीवनराम छात्रावास योजनेअंतर्गत विद्यानगरी येथे मुला-मुलींचे वसतिगृहांचे बांधकाम,विद्यानगरी येथे हिंदी भाषा भवनचे बांधकाम,मल्टीपर्पज हॉलचे बांधकाम,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि अधिका-यांसाठी निवासस्थानांचे बांधकाम या अशा नियोजित बांधकामाना प्राधान्य देण्यात आले आहे.

**२०१६-२०१७ नवीन उपक्रम/योजना**

**१. कौशल्य विकास केंद्र**

- झाराप, जिल्हा, सिंधुदुर्ग – १ कोटी
- पालघर, जि. पालघर - १ कोटी

**२. विद्यार्थी व्यवसाय मार्गदर्शन केंद्र, नवी मुंबई - १० लाख**

**३. विद्यापीठाचे मल्टी - डायमेन्शनल विकास कार्यक्रम**

- शारिरिक शिक्षणाचे श्रेष्ठत्व केंद्र -१ कोटी

- क्रिडा, संरक्षण पुनर्वासनाचे श्रेष्ठत्व केंद्र -१ कोटी
- नविन्यपुर्ण आणि उद्योगजकत्वाचे श्रेष्ठत्व केंद्र - १ कोटी
- क्रिडा श्रेष्ठत्व केंद्र - १ कोटी

४. **रेल्वे संशोधन केंद्र (रत्नागिरी, मुंबई) – १० लाख**

५. **मेक इन इंडिया केंद्र**

- शेती – २० लाख
- मुलभूत सोयीसुविधा - २० लाख
- रेल्वे - २० लाख
- संरक्षण - २० लाख

६. **डिजिटल विद्यापीठ – २ कोटी**

७. विद्यापीठाचे भारतातील आणि भारताबाहेरील कॅम्पस – २० लाख

८. **संरक्षित जागेचा विकास**

- पाणथळ जागा – १ कोटी
- वनस्पती शास्त्र उद्यान – १ कोटी

९. **शैक्षणिक विद्वतेची जोपासना**

- बौद्धिक संपत्ती हक्काचे पेटंटमध्ये परावर्तित करण्यासाठी प्रोत्साहन – २५ लाख
- संशोधन आणि नाविण्यपुर्ण कल्पनांसाठी प्रोत्साहन – ३० लाख
- पी.एच.डी स्कॉलर्स/पी.डी.एफ/पुल ऑफीसर्ससाठी शैक्षणिक सहाय्य – २५ लाख

१०. **स्मार्ट गाव योजना (५ गाव – ५ जिल्हा) – ५० लाख**

११. **विद्यापीठाची सामाजिक जबाबदारी**

- कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचे शैक्षणिक/ कौशल्य विकास – २५ लाख
- परदेशी शिक्षणासाठी इच्छुक असलेले मुंबई विद्यापीठातील विद्यार्थांसाठी कॉलेज बोर्ड कोड अर्ज आणि सभासदत्व सादर करण्यासाठी – २५ लाख
- स्वच्छ कॉलेज अभियान – ५० लाख

१२. **आंतर- विद्यापीठ/संस्थांचे सहकार्य**

(विद्यार्थी/विद्याशाखा विनिमय, सामंजस्य कराराचा विकास. द्वि- पदवी कार्यक्रम)

- राष्ट्रीय – १० लाख
- आंतरराष्ट्रीय – २५ लाख

१३. **१६० वा स्थापना दिवस कार्यक्रम**

- चर्चासत्रे / कार्यशाळा – १ कोटी
- माहितीपट व चित्रपटांची निर्मिती – ५० लाख
- प्रकाशने – १ कोटी
- भाषणांची मालिका – २० लाख

**१४. मुंबई विद्यापीठाच्या मुद्रणालयाची क्षमता वाढविणे –** ३ कोटी ५० लाख

**१५. विद्यापीठ सुधारणा**

- ब्रॅन्डींग अँड पोर्टल डिझाईनिंग – २५ लाख
- विद्यापीठचे ब्रिक्स/आणि जागतिक विद्यापीठामध्ये रँकिंग सुधारणेबाबत – २० लाख

१६. ऑनलाईन आणि डायनॅमिक शिक्षण केंद्र – लाख

याबरोबरच विद्यापीठाला आर्थिक वर्ष २०१५ -२०१६ या वर्षाकरीता विविध माध्यमातून १ कोटी ४ लाख २९ हजार ३३३ एवढी रक्कम देणगी स्वरुपात प्राप्त झाली आहे.

याचबरोबर आज पार पडलेल्या अधिसभेच्या बैठकीत हरीत क्रांतीचे जनक डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांना मुंबई विद्यापीठाची अत्यंत मानाची असलेली डी. लिट ही सर्वोच्च पदवी बहाल करण्यात येणार आहे. यासाठीसाचा ठराव आज अधिसभेत एकमुखाने मंजूर करण्यात आला. मुंबई विद्यापीठाने २००२ साली सुप्रसिध्द अर्थशास्त्रज्ज्ञ डॉ.अमर्त्य सेन यांना मानद डी.लिट ही पदवी बहाल केली होती.डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांच्या कार्याचा आणि देशाच्या उभारणीसाठी असलेल्या योगदानांचा यथोचित गौरव करण्याचा बहुमान मुंबई विद्यापीठाला यानिमित्ताने मिळाला असल्याने डॉ.एम.एस. स्वामीनाथन यांना बहाल करण्यात येणा-या या मानद डी.लिट पदवीमुळे विद्यापीठाच्या बहुमानात मानाचा शिरपेच रोवला गेला आहे.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क / प्रकाशन / सांख्यिकी )